


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३१५, शुक्रवार ६ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## ग्रामदैवत श्रीनागेश्वरांच्या कृपाशीर्वादाने पारनेरला भक्तीची वैभवशाली परंपरा

### ■ गुणेशमहाराज पारनेरकर यांचे प्रतिपादन ■ तब्बल १५ तासांच्या ग्रामप्रदक्षिणेनंतर पालखी सोहळ्याची सांगता.

पारनेर : प्रतिनिधी

**बारा ज्योतिर्लिंगांची मंदिरे असलेल्या पारनेरमध्ये ग्रामदैवत श्रीनागेश्वरांच्या कृपाशीर्वादाने भक्तीची अनोखी परंपरा लाभली आहे.भक्तीची ही परंपरा दिवसेंदिवस वृध्दिंगत होत चालली आहे ही पारनेरकरांच्या दृष्टीने अभिमानास्पद बाब असल्याचे प्रतिपादन गुणेशमहाराज पारनेरकर यांनी केले.**

श्रीनागेश्वरांच्या महापुजेनिमीत्त परंपरेप्रमाणे आयोजित करण्यात आलेला पालखी सोहळा तब्बल पंधरा तासांच्या ग्रामप्रदिक्षणेनंतर मंदिराच्या प्रांगणात पोहचल्यावर श्रीनागेश्वरांच्या महापुजा उत्सवाची सांगता झाली.यावेळी गुणेशमहाराज पारनेरकर बोलत होते.

श्रीनागेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष संजय वाघमारे, खजिनदार शिरीष शेटीया,विश्वस्त दत्तात्रेय आंबुले,विजय डोळ,प्रकाश घोडके,उद्योजक राजेंद्र औटी, महापुजेचे यजमान राजेंद्र पुजारी, पालखीचे मानकरी आदी उपस्थित होते.

दरम्यान बुधवारी सकाळी ९ वाजता महापुजेचे यजमान पुजारी यांच्या हस्ते महारूद्र अभिषेकाचा संकल्प सोडल्यानंतर महापुजा उत्सवाला सुरुवात झाली.परंपरेप्रमाणे श्रीनागेश्वरांच्या मुकुटाची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक मंदिरात आल्यावर महाआरती झाली. राज्याच्या





विविध भागात नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने स्थिरावलेल्या पारनेरकर भाविकांनी महापुजा उत्सवासाठी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

बुधवारी (दि.४) रात्री ९ वाजता श्रीनागेश्वर मंदिराच्या प्रांगणातून पालखी सोहळ्याने ग्रामप्रदिक्षणेसाठी प्रस्थान ठेवले.मानाच्या छत्र्या,अब्दागिरी,हिलाळ घेऊन पालखीचे मानकरी, मंदिरांचे गुरव पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते.टाळ,मृदुंगाच्या साथीने सुरू असलेल्या भजने,अभंगाच्या गजरात व सनई,चौघड्याच्या मंगलमय सुरात पालखी सोहळ्याने प्रस्थान ठेवले.पार्वती पते हरहर महादेव, श्रीनागेश्वर महाराज की जय अशा जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.

मंदिराच्या प्रांगणातून सुरू झालेला पालखी सोहळा बोळकोबा चौकातून,नवी पेठ,खालची वेस, मुख्य बाजारपेठेतून रात्री दोन वाजण्याच्या सुमारास पारनेरचे आराध्य दैवत श्रीभैरवनाथ मंदिरात विसावला. तेथे पहाटे पावणेतीन वाजता श्रीभैरवनाथाची नियमित आरती झाली.त्याचबरोबर श्रीनागेश्वरांची आरती करण्यात आली.त्यानंतर पहाटे पाच वाजता पालखी सोहळा ग्रामप्रदक्षिणेसाठी रवाना झाला.भल्या पहाटे भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.शहराच्या विविध भागातून आज, गुरूवारी (दि.५ सप्टेंबर) दुपारी १२ वाजता पालखी सोहळा मंदिराच्या प्रांगणात आला. तेथे विविध भजनी मंडळांनी भजने सादर केली.महाआरती व महाप्रसादाने महापुजा उत्सव व पालखी सोहळ्याची सांगता झाली. महापुजा उत्सव व पालखी सोहळ्याच्या निमित्ताने संगीत रत्न, पंडित बाळासाहेब वाईकर यांच्या भक्तीसरगम संगीत मैफीलीचे आयोजन करण्यात आले होते.बुधवारी रात्री १० वाजता तसेच गुरूवारी सकाळी १० वाजता अश्या दोन सत्रात झालेल्या या मैफिलीत पंडित वाईकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या सुश्राव्य गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

## भंडारदरा धरणाचे नाव बदलले !

### आद्यक्रांतीकारक वीर राघोजी भांगरे जलायश नामकरण

अकोले : प्रतिनिधी



**राज्य सरकारने कळसूबाई शिखराच्या पायथ्याशी असणाऱ्या भंडारदरा धरणाचे नाव बदलण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या धरणाला आता आद्यक्रांतीकारक वीर राघोची भांगरे जलायश असे नाव देण्यात आले आहे. यासंबंधीचा एक शासनादेशही तत्काळ जारी करण्यात आला आहे.**

नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात भंडारदरा धरण आहे. या धरणावर जलविद्युत केंद्रही आहे. हा परिसर निसर्ग सौंदर्याने नटलेला असल्याने येथे वर्षभर पर्यटकांचा राबता असतो. येथील छोटे - मोठे धबधबे, डोंगरकडे, जलाशय, हिरवी झाडे, शुद्ध व थंड हवा येथील मूळच्या सौंदर्यात अजूनच भर टाकतात. विशेष म्हणजे भंडारदरा धरण आणि रंधा धबधबा हे पर्यटकांचे येथील मुख्य आकर्षणाचे केंद्रबिंदू आहेत.

भंडारदरा धरणाच्या नामकरणाबाबत शासनाला अनेक अर्ज प्राप्त झाले होते. त्यानुसार सरकारने हा निर्णय घेतला आहे. जलसंपदा विभागाच्या अखत्यारितील अकोले तालुक्यातील भंडारदरा जलाशयास आद्यक्रांतीकारक वीर राघोजी भांगरे जलाशय असे नामकरण देणेबाबत शासनास विविध अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर जलाशयाचे ''आद्यक्रांतीकारक वीर राघोजी भांगरे जलाशय'' असे नामकरण करण्यात आले आहे, असे यासंबंधीच्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

**आतापर्यंत तिसऱ्यांदा बदलले नाव**

भंडारदरा धरण हे १९२६ साली ब्रिटीशांनी बांधले होते. मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड वेलस्ली विल्सन यांच्या हस्ते या धरणाचे उद्घाटन करण्यात आले होते. तेव्हा त्याला विल्सन डॅम असे नाव देण्यात आले होते. तेव्हापासून आतापर्यंत शासन दरबारी हे भंडारदरा धरण हे विस्लन डॅम या नावाने ओळखले जात होते. भंडारदरा धरणाच्या जलाशयाला तत्कालीन ब्रिटिश इंजिनियर ऑर्थर हिल यांचे नाव देण्यात आले होते. त्यामुळे या धरणाच्या जलाशयाला ऑर्थर लेक असेही संबोधण्यात येत होते. आता या धरणाचं नाव तिसऱ्यांदा बदलण्यात आले आहे.



# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## तुमचा WiFi पासवर्ड विसरलात? काळजी नको... आम्ही सांगतो ते करा...



**जर तुम्ही वायफाय वापरत असाल आणि पासवर्ड शोधण्यात अडचण येत असेल किंवा तुम्ही तुमचा वायफाय पासवर्ड विसरला असाल तर काळजी करण्याची गरज नाही. आम्ही तुम्हाला काही सोप्या युक्त्या सांगणार आहोत. त्याच्या मदतीने तुम्हाला वायफाय पासवर्ड लक्षात ठेवणे खूप सोपे होईल. याशिवाय तुम्हाला पासवर्ड कुणासोबत शेअर करायचा असेल तर तुम्हाला या सोप्या पद्धती फॉलो कराव्या लागतील...**

### Android फोनमध्ये कसे शोधायचे ?

अँड्रॉईड फोनमधील वायफायचा पासवर्ड जाणून घेण्यासाठी सर्वप्रथम तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल. यामध्ये तुम्हाला WiFi चा पर्याय दिसेल. इथे गेल्यावर तुम्हाला भरपूर वायफाय दिसेल. आता तुम्हाला जाणून घ्यायच्या असलेल्या कोणत्याही वायफाय नेटवर्कच्या पासवर्डची माहिती तुम्ही शेअर करू शकता किंवा मिळवू शकता. वायफाय नेटवर्कवर गेल्यावर तुम्हाला शेअर किंवा वायफाय क्यूआर कोडचा पर्याय दिसेल. हे केल्यानंतर, तुमच्या स्क्रीनवर QR कोड दिसू लागेल. येथे तुम्हाला WiFi पासवर्ड देखील दिसेल. आता अशा परिस्थितीत, जर एखाद्या वापरकर्त्याला वायफाय कनेक्ट करायचे असेल तर त्याला फक्त हा QR कोड स्कॅन करावा लागेल.

### आयफोन वापरकर्ते कसे कनेक्ट करू शकतात ?

जर तुम्ही आयफोन वापरकर्ता असाल तर प्रक्रिया थोडी वेगळी असणार आहे. यामध्येही सर्वप्रथम तुम्हाला सेटिंगमध्ये जावे लागेल आणि नंतर वायफाय पर्यायावर जावे लागेल. यानंतर तुम्हाला कनेक्टेड नेटवर्क पर्यायावर जावे लागेल. यामध्ये तुम्हाला एक छोटा 'i' आयकॉन दिसेल. यावर क्लिक केल्यानंतर तुम्हाला फेस आयडी किंवा टच आयडीच्या पर्यायावर जावे लागेल. हे केल्यानंतर, तुम्हाला ऑटो-जॉइन पर्यायाच्या खाली नेटवर्क पासवर्ड दिसेल. ते सेव्ह केल्यानंतर, तुम्ही ते इतर वापरकर्त्यांसोबत शेअर करू शकाल. वायफाय कनेक्शनबाबतही तुम्हाला खूप सावध राहण्याची गरज आहे. एक चूक तुम्हाला त्रास देऊ शकते. त्यामुळे वायफाय पासवर्ड शेअर करताना खूप काळजी घ्यावी लागेल.

## व्हॉट्सअ‍ॅप अलर्ट!

## तुमचे खाते आपोआप लॉग आउट झालेय ?

**तुम्ही जर व्हॉट्सअ‍ॅप वापरत असाल तर तुमच्यासाठी एक महत्त्वाची बातमी आहे, कारण व्हॉट्सअ‍ॅपमध्ये एक बग समोर आला आहे, जो व्हॉट्सअ‍ॅपच्या सुरक्षेसाठी धोकादायक मानला जात आहे. या बगमुळे व्हॉट्सअ‍ॅप अकाउंट आपोआप लॉग आउट होत आहे. सोशल मीडिया वापरकर्ते अनेक व्हॉट्सअ‍ॅप अकाउंट्स X वर लॉग आउट झाल्याची तक्रार करत आहेत. अशा परिस्थितीत हे कसे टाळता येईल हे जाणून घेऊया ?**

### तक्रार काय आहे ?

व्हॉट्सअ‍ॅप अकाऊंट लॉगआऊट झाल्याच्या बहुतांश तक्रारी डेस्कटॉपवर येत आहेत. साधारणपणे, WhatsApp खात्यातून लॉग आउट केल्यानंतर, पुन्हा लॉगिन करण्यासाठी ६ अंकी OTP आवश्यक आहे. तथापि, बगमुळे हे होत नाही. अशा परिस्थितीत हा सुरक्षेचा मोठा धोका मानला जात आहे. अँड्रॉइड, आयओएस आणि वेब यूजर्स या बगबद्दल तक्रार करत आहेत.

### संरक्षण कसे करावे ?

व्हॉट्स अ‍ॅप सपोर्ट पेजनुसार, ही सुरक्षा समस्या आहे. सध्या हा बग टाळण्यासाठी व्हॉट्सअ‍ॅपकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. तथापि, तुम्ही तुमच्या सुरक्षिततेसाठी टू फॅक्टर ऑथेंटिकेशन प्रोसेस अवलंबू शकता.



### टू फॅक्टर ऑथेंटिकेशन कसे चालू करावे ?

- सर्व प्रथम WhatsApp उघडा. यानंतर सेटिंग ऑप्शनवर टॅप करा.
- त्यानंतर तुम्हाला अकाउंट ऑप्शनवर टॅप करावे लागेल.
- यानंतर तुम्हाला टू फॅक्टर ऑथेंटिकेशन पर्यायावर टॅप करावे लागेल.
- यानंतर खाते सुरक्षित करण्यासाठी ६ अंकी कोड टाकावा लागेल.
- यासोबतच ईमेल टाकावा लागेल आणि ईमेलची पडताळणी करावी लागेल.
- यानंतर, जेव्हा तुमचे व्हॉट्सअ‍ॅप खाते लॉग आउट होईल, तेव्हा तुम्हाला सिक्युरिटी पिन टाकावा लागेल.

## उठसूट कोणतेही फोटो अन् व्हिडीओ शेअर करताय?

# तुरुंगात जावे लागेल!



**सोशल मीडियाच्या युगात फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्यासाठी अनेक प्लॅटफॉर्म आहेत. जिथे रोज करोडो फोटो आणि व्हिडीओ शेअर केले जातात. पण कधी कधी असे करणे महागात पडते आणि तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते. अशा परिस्थितीत, फोटो आणि व्हिडीओ ऑनलाइन शेअर करण्याचे नियम तुम्हाला माहीत असणे आवश्यक आहे, अन्यथा तुम्ही कायद्याच्या जंजाळात अडकू शकता. व्हिडीओ आणि फोटो शेअरिंगबाबत भारतात अनेक कायदे आहेत, त्यांचे उल्लंघन केल्यास तुरुंगात जावे लागू शकते. चला सविस्तर जाणून घेऊया...**

- माहिती तंत्रज्ञान कायदा २००० : हा कायदा फोटो, व्हिडिओ, इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी, कॉपी राईट्स यांसारख्या बाबी हाताळतो. जर तुम्ही वापरकर्त्यांच्या परवानगीशिवाय असे कोणतेही दस्तऐवज शेअर केले तर तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते.
- माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ : हा नियम इंटरनेट प्लॅटफॉर्मद्वारे पोस्ट केलेल्या आणि होस्ट केलेल्या सामग्रीशी संबंधित आहे. याचा अर्थ इंटरनेट प्लॅटफॉर्मला वापरकर्त्यांची गोपनीयता आणि नग्नतेची काळजी घ्यावी लागेल.
- द्वेषयुक्त भाषण कायदा, १९५६ : या कायद्यांतर्गत एखाद्याला ऑनलाइन अपमानास्पद किंवा असभ्य भाषा वापरल्याबद्दल शिक्षा होऊ शकते.
- गुन्ह्यांपासून महिलांचे संरक्षण आणि लैंगिक छळ कायदा, २०१३ : या नियमानुसार महिलांवरील लैंगिक छळ आणि लैंगिक अत्याचार हा गुन्हा आहे.

### फोटो आणि व्हिडीओ शेअर केल्यावर जेल कधी होणार ?

- एखाद्या व्यक्तीच्या गोपनीयतेचे उल्लंघन करते तेव्हा...
- कोणत्याही व्यक्तीला बदनाम करते किंवा त्यांना मानसिक वेदना देते तेव्हा...
- अश्लील भाषा किंवा लैंगिकदृष्ट्या सुस्पष्ट सामग्री पोस्ट करता तेव्हा...
- मुलांचे लैंगिक शोषण किंवा अत्याचाराचे चित्रण घडते तेव्हा...
- हिंसा किंवा द्वेषयुक्त भाषण भडकवते तेव्हा...

### तक्रार कुठे करावी ?

- जर तुम्हाला वाटत असेल की एखादा व्हिडिओ किंवा फोटो कायद्याचे उल्लंघन करत आहे, तर तुम्ही सायबर क्राईम तक्रार पोर्टलवर तक्रार करू शकताः https://cybercrime.gov.in/
- तुम्ही राष्ट्रीय महिला आयोग येथेदेखील तक्रार नोंदवू शकता. http://ncw.nic.in/
- किंवा तुमचे स्थानिक पोलिस स्टेशन.



## पासपोर्टचे ऑनलाइन नूतनीकरण कसे करावे?

**पासपोर्ट हा एक व्हर्चुअल दस्तऐवज आहे, जो राष्ट्रीय ओळखीचा पुरावा म्हणून ओळखला जातो. सुट्टी, नोकरी किंवा शिक्षणासाठी दुसऱ्या देशात जाण्यासाठी पासपोर्ट आवश्यक आहे. तथापि, पासपोर्टची वैधता देखील आहे. तथापि, पासपोर्टची वैधता १० वर्षे आहे. यानंतर पासपोर्टचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. पासपोर्टची वैधता संपण्यापूर्वी ९ महिने आधी त्याचे नूतनीकरण केले पाहिजे. तुमचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्यास ५ वर्षांनंतर पासपोर्टचे नूतनीकरण करावे लागेल. मात्र, पासपोर्टचे नूतनीकरण सहज करता येते. त्याची प्रक्रिया जाणून घेऊया...**




### कोणती कागदपत्रे लागतील ?

- वैध पासपोर्ट
- तुमच्या वर्तमान पासपोर्टच्या पहिल्या आणि शेवटच्या पृष्ठाची छायाप्रत असणे आवश्यक आहे.
- ईसीआर/नॉन-ईसीआर पृष्ठाची स्वतः प्रमाणित छायाप्रत
- पत्त्याचा पुरावा
- वैधता विस्तार पृष्ठाची छायाप्रत
- कोणत्याही निरीक्षण पृष्ठाची स्वतः प्रमाणित छायाप्रत

### पासपोर्ट नूतनीकरण शुल्क

- १० वर्षांची वैधता असलेल्या ३६ पानांच्या पासपोर्टसाठी १५०० रुपये शुल्क भरावे लागते, तर तत्काळसाठी २००० रुपये शुल्क आकारले जाते.
- १० वर्षांच्या वैधतेच्या ६० पानांच्या पासपोर्टसाठी २००० रुपये शुल्क आकारले जाते, तर तत्काळसाठी २००० रुपये शुल्क भरावे लागते.
- १८ वर्षांखालील मुलांसाठी ५ वर्षे वैधता असलेल्या ३६ पानांच्या पासपोर्टची फी १००० रुपये आहे, तर तत्काळसाठी २००० रुपये भरावे लागतील.
- १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी १० वर्षांच्या वैधतेसह ३६ पानांच्या पासपोर्टसाठी १५०० रुपये शुल्क भरावे लागेल, तर तत्काळसाठी २००० रुपये द्यावे लागतील.

### पासपोर्टचे ऑनलाइन नूतनीकरण कसे करावे...

- पायरी १ : पासपोर्ट सेवा वेबसाइटला भेट द्या.
- पायरी २ : नोंदणी पूर्ण झाल्यास, तुमच्या आयडीने लॉग इन करा.
- पायरी ३ : लॉगिन क्रेडेन्शियल्ससह पोर्टलवर प्रवेश करा.
- पायरी ४ : यानंतर Apply for a New Passport/Re-issue of Passport पर्यायावर टॅप करा.
- स्टेप ५ : यानंतर, सर्व आवश्यक कागदपत्रे बरोबर आहेत या पर्यायावर क्लिक करा.
- पायरी ६ : नंतर पेमेंट आणि शेड्यूल पर्याय निवडा.
- पायरी ७ : यानंतर पेमेंट पूर्ण करा.
- पायरी ८ : यानंतर फॉर्म सबमिट करा.
- पायरी ९ : त्यानंतर ॲप्लिकेशन प्रिंट करण्याचा पर्याय निवडा.
- पायरी १० : यानंतर, सर्व आवश्यक कागदपत्रे आणि तुमच्या सबमिट केलेल्या अर्जासह नियोजित तारखेला जवळच्या पासपोर्ट सेवा केंद्रावर जा.



## फोन हॅकिंग : फोनवर हे 8 चिन्ह दिसले तर होतेय हेरगिरी!




**इंटरनेटच्या जमान्यात फोन हॅक होण्याच्या घटना वाढल्या आहेत. तसेच, प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रवेश होत आहे, त्यामुळे फोन हॅक करणे सोपे झाले आहे. अशा परिस्थितीत, तुमचा फोन हॅक झाला आहे हे तुम्हाला कसे कळेल ? खरं तर, आज आम्ही तुम्हाला काही चिन्हे सांगणार आहोत, ज्याद्वारे तुम्ही समजू शकता की तुमचा फोन हॅक झाला आहे...**

- बॅटरी आयुष्य : जर तुमच्या फोनची बॅटरी लवकर डिस्चार्ज होत असेल, तर तुमचा फोन हॅक झाला असण्याची शक्यता आहे. कारण काहीवेळा बॅकग्राउंडमध्ये चालणाऱ्या हेर ॲप्समुळे फोनची बॅटरी लवकर डिस्चार्ज होते. अशा परिस्थितीत फोनच्या बॅटरीकडे लक्ष देण्याची गरज आहे.
- फोनवर अनावश्यक ॲप्स : तुम्ही तुमच्या फोनमध्ये ॲप्सचा तपशील ठेवावा. जेणेकरून तुमच्या परवानगीशिवाय तुमच्या फोनवर कोणतेही ॲप इंस्टॉल होणार नाही. असे झाल्यास फोन हॅक होऊ शकतो. या अज्ञात ॲप्समध्ये गुप्तचर सॉफ्टवेअर असू शकते.
- डिव्हाइस जास्त गरम करणे : हेरगिरी करणारे ॲप्स सहसा यासाठी जीपीएस प्रणाली वापरून रिअल टाइममध्ये डिव्हाइसचे स्थान ट्रॅक करतात. अशा परिस्थितीत तुमच्या फोनच्या हार्डवेअरवर जास्त दबाव येतो. त्यामुळे जास्त गरम होण्याची समस्या उद्भवते.
- डेटा वापरात वाढ : जर तुमचा फोन ट्रॅक केला असेल तर डेटाचा वापर अचानक वाढतो. अशा परिस्थितीत डेटा वापरात अचानक वाढ होत असेल, तर तुम्ही सतर्क राहायला हवे.
- डिव्हाइस खराबी : जेव्हा फोन हॅक होतो, तेव्हा स्क्रीन फ्लॅशिंग, स्वयंचलित फोन सेटिंग्ज बदलणे किंवा फोन काम करत नाही, डिव्हाइस खराब होणे यासारख्या घटना दिसू शकतात.
- कॉल करताना पार्श्वभूमी आवाज : काही गुप्तचर ॲप्स फोन कॉल रेकॉर्ड करतात. अशा परिस्थितीत, जेव्हा फोन कॉल दरम्यान कोणताही पार्श्वभूमी आवाज ऐकू येतो तेव्हा एखाद्याने सावध राहावे, कारण हे हॅकिंगचे लक्षण असू शकते.
- अनावश्यक ब्राउझिंग हिस्ट्री : ट्रॅकिंग किंवा गुप्तचर अनुप्रयोग डाउनलोड करण्यासाठी लिंक केलेल्या वेबसाइट शोधण्यासाठी आपल्या डिव्हाइसच्या ब्राउझिंग इतिहासाचे निरीक्षण करा.

## शॉर्ट न्यूज

### विवाहितेची सासरच्यांकडून फसवणूक

■ **नगर :** पतीच्या निधनानंतर ननंद व तिच्या पतीने राहत्या घराचा खोट्या कागदपत्राद्वारे व्यवहार करून फसवणुक केल्याप्रकरणी संबंधीतांवर कारवाई करण्याची मागणी पिडीत महिला रिना कौसर सारसर हिने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे. रीना सारसर या नालेगाव म्युनिसिपल कॉलनीत दोन मुली सोबत राहत आहे. नवऱ्याचे निधन झाल्याने एकटी असल्याचा फायदा घेऊन मोठी ननंद आणि तिच्या पतीने संगनमत करून जावेच्या दोन्ही मुलांना सोबत घेऊन फसवणूक केली आहे.

### आय. ए. एस. अभिजीत पठारे यांचे व्याख्यान

■ **पारनेर :** महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्य विद्यालय भाळवणी, येथील विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत कसे यशस्वी व्हावे याचे बहुमूल मार्गदर्शन आय. ए. एस. अधिकारी अभिजीत पठारे यांनी विद्यालयात उपस्थित राहून विद्यालयात व्याख्याना द्वारे मार्गदर्शन यावेळी अभिजित पठारे म्हणाले कि, ग्रामीण भागातील मुलांना जीवनात यशस्वी होण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही सांगितले .

### जप्त दागिने पोलीस अधिकाऱ्यांनी दिले परत

■ **नेवासा :** नेवासा फाटा येथे बंद घराचे कुलूप व कडी कोयंडा तोडून चोरीस गेलेले दागीने फिर्यादीला नेवासा न्यायालयाच्या आदेशाने परत करण्यात आले आहे. अशी माहिती पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी दिली. फिर्यादी किशोर रावसाहेब शिंदे यांचे बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरटे ६० हजार रुपयांचे गंठण, ४० हजार रुपये किमतीचा गळ्यातील सर, १८ हजार रुपये किमतीचे झुबे, २० हजार रुपये किमतीची कानातील बहुराणी, नथ, अंगठी व ६६०० रुपये रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला होता. जालना जिल्ह्यातील चोरट्यांकडून पोलिसांनी सदर ऐवज हस्तगत केला होता.

### श्वेता लोणारी कुस्ती स्पर्धेत प्रथम

■ **कोपरगाव :** एसएसजीएम महाविद्यालयातील अकरावी कॉमर्सची विद्यार्थिनी श्वेता भगवान लोणारी हीने ५० किलो वजन गटात जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. कर्जत येथील दादा पाटील महाविद्यालयात जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा पार पडल्या. यात श्वेता लोणारी हिने प्रथम क्रमांक मिळविला. त्याबद्दल तिचे प्रभारी प्राचार्य डॉ. उज्वला भोर, उपप्राचार्य प्रा. डॉ. बाबासाहेब शेंडगे, उपप्राचार्य संजय शिंदे, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. बाबासाहेब वाघ यांनी अभिनंदन केले.

# नगर-दौंड महामार्गावर भीषण अपघात

■ १ ठार, ५ जखमी ■ भरधाव मालट्रकची कारला समोरून धडक

**नगर : प्रतिनिधी**

**नगर-दौंड महामार्गावर काळेवाडी (ता. नगर) गावाजवळ बुधवारी सकाळी साडेसातच्या सुमारास भरधाव मालट्रक आणि इर्टीगा कार यांच्यात समोरासमोर धडक बसली. या भीषण अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. कारमधील अन्य चौघे जण जखमी झाले आहेत. आदेश डाकरे (वय २७, रा. श्रीरामनगर, छत्रपती संभाजीनगर) असे मृताचे नाव आहे. मयूर बाबासाहेब कुदळे, अभिजित बच्छिरे, हरीश आनंदराव घडामोडे, समरजित मनसिरे, शिवराज दामोदर शिंदे, सर्व रा. श्रीरामनगर, छत्रपती संभाजीनगर अशी जखमींची नावे आहेत.**



छत्रपती संभाजीनगरचे आदेश डाकरे याच्यासह पाच जण इर्टीगा कारने (एमएच २० ई वाय १०१२) नगरहून दौंडकडे जात होते. बुधवारी सकाळी साडेसातच्या सुमारास काळेवाडी (हिवरेझरे) शिवारात दौंडकडून नगरकडे येणाऱ्या भरधाव मालट्रकची (एचआर ५५ व्ही ४४७८) समोरून येणाऱ्या कारला समोरासमोर धडक बसली. अपघात इतका भीषण होता की, कारचा चक्काचूर झाला. यात कारमधील आदेश डाकरे हा जागीच ठार झाला. कारमधील चार जण जखमी झाले. कारमध्ये अडकलेला मृत व जखमींना बाहेर काढण्यासाठी स्थानिक नागरिक नारायण रोडे, तुषार पवार, शैलेश काळे, पिंटू काळे, नितीन काळे, बापू काळे, राहुल काळे, सुभाष काळे यांनी मदत केली. गॅस कटरच्या मदतीने मृत व जखमींना कार बाहेर काढण्यात यश आले.

शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख संदेश कार्ले यांनी घटनास्थळी येऊन वाहने रस्त्याच्या बाजूला काढण्यासाठी क्रेन बोलावले. स्थानिक नागरिक व कार्ले यांनी जखमींना उपचारासाठी रुग्णवाहिकेतून नगरला पाठवले. नगर तालुका पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक अस्लम पठाण, पोहेकॉ राहुल द्वारके यांनी तसेच महामार्ग पोलिसांच्या पथकाने मालट्रक चालक सलीम मोहंमद (रा. मणिपूर) याला ताब्यात घेतले. नगर-दौंड महामार्गावर बाबुर्डी बेंद फाट्यावर मागील आठवड्यात खासगी बस उलटली होती. त्यात दोघांचा मृत्यू, तर ५ ते ६ प्रवासी जखमी झाले होते. ही घटना ताजी असतानाच बुधवारी सकाळी पुन्हा भीषण अपघात झाला.

## वाचकांच्या लेखणीतून

# चांगलं असतं!

पावसाळ्यात आमच्या गावच्या ओढ्याला आलेला पहिला पूर पाहणे हा आम्हा शाळकरी मुलांसाठी अद्भूत आनंद असायचा.

ओढ्याला पहिला पूर आला म्हणजे आम्हा लहानमोठ्या मुलांचे कोंडाळे ओढ्याच्या पात्रात नवीन पुराच्या पुढेपुढे चालतनाचत असू. आमच्यापेक्षा वयाने मोठाली मुले आम्हाला सांगत, पुराच्या जिभेला तुमची जीभ लावा. चांगलं असतं.



चांगलं असतं म्हणजे नेमकं काय असतं ते कळण्याचे आमचे वय नव्हते. चांगलं असतं एवढेच आमच्यासाठी पुरेसे होते. मग आम्ही पाठीचा कणा दुमडून दुमडून पुराच्या जिभेला जिभा लावीत असू. कारण चांगलं असतं! म्हणतात ना जोश में होश कहां? त्या वयात होश कमी; पण जोश जास्त असतो. काही तरी अद्भूत करून दाखवायची उर्मी उरात उफाळून येत असते!

पुढे मी वयाची पन्नाशी उलटल्यानंतर एकांतात विचार करीत होतो. ती मोठी मुले पहिल्या पुराच्या जिभेला जिभा लावा. चांगलं असतं. असे का बरे सांगत असावीत? अचानक मला साक्षात्कार झाला! पहिल्या पुरात ओढ्यात पडलेली मृत जनावरांची कडकडीत हाडे, जनावरांचे वाळलेले गोलाकार शेण, शेळ्यांच्या हिरव्यागार लेंड्या, काटेरी आणि बिन काटेरी काटक्याकुटक्या, माणसांच्या वाळलेल्या विष्ठांची कडक लेंडके, कुरकुरीत भजी, गोलकडक जिलेब्या त्या पहिल्या पुरात वाहत येत. मोठाली मुले हे अद्भूत रहस्य आम्हा लहान मुलांना सांगत नसत. पुराच्या जिभेला जिभा लावा. चांगलं असतं. हा त्यांचा उपदेश आमच्यासाठी प्रमाण असे. आता त्या मोठ्या मुलांचा राग येण्याऐवजी आमच्याच मूर्खपणाचा मला राग आला. पण करणार काय? म्हणे चांगलं असतं!

■ **नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# एसटी कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे

## सरकारकडून पगारात साडे सहा हजारांची वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

**आपल्या विविध मागण्यांसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्मचाऱ्यांनी दोन दिवसांपासून कामबंद आंदोलन सुरू केलं होतं. त्यामुळे राज्यभरातील एसटी सेवा विस्कळीत झाली होती. दरम्यान, यासंदर्भात बुधवारी मुख्यमंत्री आणि एसटी कामगार संघटना यांच्यात बैठक पार पडली. या बैठकीनंतर आता एसटी कर्मचाऱ्यांनी संप मागे घेत असल्याचे जाहीर केलं आहे.**



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथी गृहावर झालेल्या बैठकीत राज्य सरकारने एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या असून त्यांच्या पगारात घसघशीत वाढ करण्यात आली आहे. सरकारने कर्मचाऱ्यांच्या मूळ पगारात साडे सहा हजार रुपयांची वाढ करण्याचे मान्य केलं आहे. तसेच ज्यांना कर्मचाऱ्यांना गुन्हे दाखल झाल्याने बडतर्फ करण्यात आले आहे. त्यांना पुन्हा कामावर घेण्याचंही सरकारने मान्य केलं आहे. सरकारच्या या निर्णयानंतर एसटी कर्मचारी संघटनांनी समाधान व्यक्त केलं आहे.

दरम्यान, सरकारच्या या निर्णयानंतर भाजपा नेते गोपीचंद पडळकर यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करत त्यांना सरसकट साडेसहा हजार रुपयांची पगार वाढ दिली आहे. ज्यांच्या पगारामध्ये २०२१ साली पाच हजार रुपयांची वाढ झाली होती. त्यांच्या मूळ पगारामध्ये दीड हजार रुपयांची वाढ झालेली आहे. ज्यांना चार हजारांची वाढ दिली होती, त्यांच्या पगारामध्ये अडीच हजारांची वाढ झाली आहे. तर ज्यांना अडीच हजारांची वाढ झाली होती, त्यांच्या पगारात चार हजार रुपायांची वाढ झाली आहे, असे ते म्हणाले. दरम्यान, राज्यात दोन दिवसांपासून एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू होता. ऐन गणेशोत्सवाच्या काळात एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या प्रवाशांचे हाल होते होते. यासंदर्भात मंत्री उदय सामंत यांनी एसटी कर्मचारी कृती समितीबरोबर बैठकही घेतली होती. मात्र, या बैठकीत तोडगा निघू शकला नव्हता. त्यानंतर आज मुख्यमंत्र्यांबरोबर एसटी कर्मचारी कृती समिती आणि विविध संघटनाच्या पदाधिकाऱ्यांची बैठकी पार पडली. या बैठकीत तोडगा निघाल्याने संप मागे घेण्यात आला आहे.

# अखेर शिल्पकार जयदीप आपटे याला अटक

## पोलिसांनी कल्याणमधून घेतले ताब्यात

**कल्याण : प्रतिनिधी**

**सिंधुदुर्ग येथील राजकोट येथे उभारण्यात आलेला पूर्णाकृती छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना घडली होती. या पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे याला बुधवारी सायंकाळी कल्याण येथून अटक करण्यात आली आहे.**



सिंधुदुर्ग राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर जनमानसात संतप्त लाट उसळली. या घटनेनंतर पुतळ्याचा शिल्पकार जयदीप आपटे याला अटक करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. आपटे याच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटना घडल्याच्या दिवसापासून आपटे पसार झाला होता. आपटे याच्या अटकेसाठी पोलिसांनी विविध तपास पथके तयार केली होती.

घटना घडल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून आपटे याच्या कल्याणमधील बाजारपेठ परिसरातील घराला कुलूप होते. त्याच्या घरासमोर संभाजी ब्रिगेड यांनी आंदोलन करून त्याच्या घरावर शिवद्रोही असे लिहिण्याचा त्याचा फोटो चिटकवण्यात आला होता. त्याच्या घरासमोर अंडी फोडून निषेध करण्यात आला होता. त्यानंतर त्याच्या पत्नीची पोलिसांनी चौकशी केली. आपटे यांच्या विषयी माहिती घेतली होती. तसेच त्याच्या पत्नी त्यांच्या कल्याणमधील घरी परतल्या होत्या.

बाजारपेठ पोलिसांना अशी माहिती मिळाली की, आपटे हा त्याच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी त्याच्या कल्याणमधील बाजारपेठे येथील घरी येणार आहे. पोलिसांनी आपटेला त्याच्या घरी येतानाच अटक केली आहे. आपटेला अटक करून तात्काळ पोलीस उपायुक्त सचिन गुंजाळ यांच्या कार्यालयात हजर केले आहे. पोलिसांकडून त्याची पुढील चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# पावणे चार हजार युवकांना थेट नियुक्ती

## युवा कार्य प्रशिक्षण योजना



**नगर : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून तरुणांना रोजगार सोबत कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत आहे. यासाठी जिल्ह्यातून आत्तापर्यंत ७ हजार ९५९ रिक्त पदे अनुसूचित करण्यात आली असून ३९३४ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. यापैकी ३७५५ उमेदवार नियुक्ती दिलेल्या ठिकाणी रुजू झाले आहेत.**

या योजनेसाठी उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्षे असणे आवश्यक आहे. पात्र उमेदवारांना आस्थापना उद्योग महामंडळामार्फत प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षण देण्यात येणार आहे. कार्य प्रशिक्षण कालावधी सहा महिन्यांचा राहणार आहे. या कालावधीत बारावी उत्तीर्ण उमेदवारांना सहा हजार रुपये, आयटीआय व पदविका उत्तीर्ण असणाऱ्यांना ८ हजार रुपये, तर पदवीधर, पदव्युत्तर उत्तीर्ण उमेदवारांना १० हजार रुपये दरमहा विद्या वेतन मिळणार आहे. नगर जिल्ह्यातून एकूण दहा हजार युवकांना रोजगारउपलब्ध करून दिला जाणार आहे. जिल्हा परिषदेतील विभागातसर्वाधिक युवकांना रोजगारमिळाला आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2



डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ

● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)

● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार

● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार

● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)

पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच



मेजर भगवान नांगरे सर

❊ आमची वैशिष्ट्ये ❊
❊ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
❊ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
❊ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
❊ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
❊ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
❊ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
❊ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
❊ ॲडमिशन ओपन ❊
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# अॅड.राहुल झावरे : नीलेश लंके प्रतिष्ठानचे चाणक्यच!

**संघर्षातून बहरलेलं नेतृत्व**
**माणसातच जगणारा माणूस**
**निष्ठा,करुणा दृढविश्वासाचा संगम**

लौकिक अर्थाने फार मोठी व जगाच्या भाषेत यशस्वी नसणारी माणसही स्वतःच्या निष्ठांच्या प्रकाशात एखादी जीवनशैली निवडून नितळ जगण्याचा प्रयत्न करतात.हा प्रयत्नच मुळी महत्वाचा असतो. तो छोटा वा मोठा नसतो. आणि आज असं नितळ जगणं जगणारे समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण करणारे व्यक्तिमत्व म्हणजे नीलेश लंके प्रतिष्ठानचे केवळ सचिवच नव्हे तर चाणक्य समजले जाणारे व्यक्तीमत्व म्हणजेच राहुल झावरे.! निष्ठा, विश्वास आणि अपार संघर्ष या तीन शब्दांमध्ये राहुल झावरे यांची ओळख करुन देता येईल. हा माणूस कष्टाची आणि घामाची जाण असणारा आहे. माणसांना आपलं मानणारा हा माणूस आहे. माणसातच जगणारा आणि खासदार आमदार नीलेश लंके यांच्या पाठिशी भावासारखा सतत उभा राहिलेला हा माणूस आहे.



प्रत्येक यशस्वी माणसाबद्दल लोकांना प्रचंड कुतूहल असत काहीजण नुसतेच त्यांचे फॅन होतात तर काहीजण त्यांचा अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात. अनुकरण करताना डोळसपणे केले तर ठीक आहे नाहीतर ते यशस्वी माणसाकडचे पैसा, कीर्ती, प्रसिद्धी, राजकीय पद आपल्याला मिळेल अशी अपेक्षा ठेवत केले तर अनुकरण करणारा माणूस गाळात जाण्याचा संभाव जास्त असतो. यशस्वी लोकांचे यश लोकांना दिसतं परंतु ते यश मिळवताना शून्यातून अत्यंत कष्टाने उभारलेल्या आयुष्याची माहिती असतेच असे नाही. हे सर्व क्षेत्रातील माणसांना लागू होतं. वनकुटे गावचे प्रथम लोकनियुक्त सरपंच म्हणून एकेकाळी काम पाहिलेले अॅड.राहुल झावरे यांची सुरुवात अतिशय संघर्षातून झाली. त्यांचे वडील बबनराव आणि आई भीमाबाई यांच्यापोटी दि. ५ सप्टेंबर १९८५ रोजी त्यांचा जन्म झाला. वडील कट्टर शिवसैनिक. स्व. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा आदेश शिरसावंद्य मानून छगन भुजबळ यांच्यासमवेत त्यांनी वेशांतर करून बेळगावात धडक देऊन मराठी माणसाचा आवाज बुलंद केला होता. सततची चळवळ आणि आत्यंतिक राजकारण याला कंटाळून त्यांनी मुंबई सोडली ती कायमचीच! त्यांनी गावी जाण्याचा निर्णय घेतला पण हा निर्णय़ कुटुंबासाठी अतिशय संघर्षाचा ठरला. जिरायती जमीन आणि डोक्यावर छत एवढ्या भांडवलावर मोठ्या कष्टाने झावरे कुटुंबाने दिवस ढकलायला सुरुवात केली.

खरेतर सुखवस्तू चाकोरीबद्दल जीवन सोडून नवआयुष्याची सुरुवात करण्याची हिम्मत, जिद्द याचा अभाव माणसात असतो. आपल्या समाजात, देशात बदल घडवण्यासाठी लागणारी जिद्द, खंबीर वृत्ती हीच माणसाला इतर माणसांपेक्षा वेगळा बनवते. राहुल झावरे यांच्याबाबतीत असंच झालं. ही कठीण परिस्थितीच त्यांना घडवत गेली. प्रतिकूल परिस्थितीतून त्यांनी शिक्षण घ्यायला सुरुवात केली. महाविद्यालयीन जीवनात प्रवेश केल्यानंतर त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. भारतीय विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी म्हणून त्यांनी केलेले काम आजही लोकांच्या स्मरणात आहे. विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी लढत असतानाच त्यांनी शिवसेनेचे काम करायला सुरुवात केली. येथेच त्यांची ओळख खासदार नीलेश लंके यांच्याशी झाली. तेंव्हापासून नीलेश लंके यांची सावली बनून ते वावरु लागले. अगदी लंके यांच्या आई त्यांना आपला तिसरा मुलगा मानतात.

जीवनामध्ये शौर्य आणि दैव यांचा संघर्ष दिसतो. दैव हे अस्थिर, अकल्पित, चंचल आणि लहरी असते. आणि शौर्य आणि दैव यांच्या संघर्षाचे उत्कट चित्र म्हणचे जीवनयुद्ध. कोरोनाच्या काळात तत्कालिन आमदार नीलेश लंके यांच्या खांद्याला खांदा लावून राहुल झावरे काम करीत होते. अतिशय कठिण परिस्थितीत त्यांनी त्यांना आखून दिलेली भूमिका पार पाडली. अनेक संकटांना त्यांनी पिटाळून लावले. लोकसभा निवडणूकीच्या काळात निवडणूक प्रचारात त्यांनी केलेले काम अतिशय मोलाचे होते. निलेश लंके यांच्या टिममधील त्यांचे महत्त्व लक्षात घेऊन विरोधकांनी त्यांच्यावर खूनी हल्ला केला. दैव बलवत्तर म्हणून राहुल झावरे या संकटातून सहीसलामत बाहेर आले.

**''जीवन त्यांना कळले हो**
**मी पण त्यांचे पक्कफळापरी**
**सहजपणाने गळले हो**
**जीवन त्यांना कळले हो.''**

राहुल झावरे यांचे वर्णन करणाऱ्या या ओळी आहेत. निष्ठा, करुणा आणि दृढविश्वास यांचा परिपूर्ण संगम त्यांच्या व्यक्तिमत्वात दिसतो. त्यांचा आज वाढदिवस. त्यांना निरोगी दिर्घायुष्य लाभो ही सदिच्छा.

■ सुदेश आबूज
९५११७२७९३६

# पारनेर ग्रामीण पतसंस्थेची रविवारी २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

## ■ २ कोटी ५६ लाखांचा निव्वळ नफा ■ संस्थापक अध्यक्ष काशिनाथ दाते यांची माहिती

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील अग्रेसर असलेली पारनेर ग्रामीण पतसंस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. मणकर्णिका लॉन्स, मंगल कार्यालय पारनेर येथे आयोजित केली असल्याची माहिती संस्थापक, अध्यक्ष काशिनाथ दाते यांनी दिली.**



यावेळी बोलताना संस्थापक चेअरमन काशिनाथ दाते यांनी सांगितले की पारनेर ग्रामीण पतसंस्थेकडे मार्च २०२४ अखेर ठेवी २११ कोटी २४ लक्ष, असुन कर्ज वितरण १७१ कोटी २४ लक्ष रुपये आहे, तसेच संस्थेला मार्च २०२४ अखेर २ कोटी ५६ लक्ष ३५ हजार ३७८ रुपये इतका निव्वळ नफा झाला आहे. संस्थेचे मार्च २०२४ अखेर खेळते भांडवल २४७ कोटी ५१ लक्ष असून वसूल भागभांडवल ६ कोटी ३४ लक्ष, राखीव व इतर निधी २४ कोटी २० लक्ष, बँक डिपॉझिट व गुंतवणूक ६३ कोटी ५२ लक्ष आहेत.

संस्थेच्या पारनेर शहर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे, खडकवाडी, शिरूर, आळेफाटा व सुपा या ८ ठिकाणी स्वमालकीच्या इमारती व गाळे आहेत, संस्था सभासदांचा १ लाख रुपयांचा अपघात विमा उतरवित असल्याची माहिती उपाध्यक्ष सुरेश बोरुडे यांनी दिली. तसेच संस्थेमार्फत आर.टी.जी.एस, एन.एफ.टी या सुविधा उपलब्ध आहेत, सर्व सामान्यांसाठी वीज बील भरणा केंद्र सुरू आहे. तरी पारनेर ग्रामीण पतसंस्थेच्या सभासदांनी रविवारी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थापक अध्यक्ष काशिनाथ दाते यांनी केले आहे.

# सावरगावमध्ये जलजीवनचे काम खोळंबले!

## शासकीय जागेतील अतिक्रमण काढा | ग्रामस्थांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी | अन्यथा आंदोलनाचा इशारा

**सावरगाव : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सावरगावमध्ये शासकीय जागेमध्ये स्थानिक ग्रामस्थांनी अतिक्रमण केल्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या जलजीवन योजनेचे काम थांबले आहे. यासंदर्भात सावरगाव येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. न्याय न मिळाल्यास नगर-कल्याण महामार्गावर आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.**

यावेळी सामाजिक कार्यकर्त्या अॅड. प्रियाताई नीलेश चिकणे, जय मल्हार क्रांती संघटनेचे बाळासाहेब शिरतार, लोकशाही मानव हित पक्षाचे रामदास साळवे, युवा नेते निलेश चिकणे, सरपंच शांताराम शिंदे, विष्णु माने, बाळासाहेब शिंदे, शिवराम चिकणे, आदी सावरगाव येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की ,मौजे सावरगाव ता.पारनेर येथील ग्रामपंचायत हद्दीतील गट नंबर १२१ व १३२ मधून ५० फुट शासकीय ओढ्याची जागा होती व आहे .सदर ओढ्याच्या जागेत अनधिकृतपणे बेकायदेशीररित्या इसम नामे सुभाष मार्तंड चिकणे व इतर हे जबरदस्तीने अतिक्रमण करून शेती करत आहे.त्याजगेत सन २०२१ मध्ये सावरगावासाठी जल जीवन पाणीपुरवठा शासकीय योजना मंजूर झालेली आहे ,या योजनेसाठी शासकीय जागेत ५० फूट ओढ्यात सार्वजनिक विहिरीचे खोदकाम अतिक्रमण करणाऱ्या ५ ग्रामस्थांनी थांबवले आहे.सदर पाणीपुरवठा शासकीय योजनेद्वारे सावरगाव येथील सर्व ग्रामस्थांचा कायमचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. परंतु संबंधित अधिकारी तहसीलदार अभियंता ,उपअभियंता पारनेर कोणतीही जबाबदारी घेण्यास तयार नाही.तसेच आम्हा ग्रामस्थांचे म्हणणे देखील ऐकून घेत नाही .त्यामुळे दि. २५/०५/२०२४ रोजी गट नं :१२१ व १३२ गटाची सरकारी मोजणी करून सदर मोजणीत ५० फुट सर्वजनिक ओढा निघत असल्याने सदर ओढ्यात सुभाष मार्तंड चिकणे यांचे अतिक्रमण असल्याचे मोजणीत आढळून आले आहे.



एका व्यक्तीचे अतिक्रमण वाचवण्यासाठी शासकीय कर्मचारी कोणतीही जबाबदारी घेत नाही. उलट अतिक्रमण करणाऱ्यास पाठीशी घालत आहे. तसेच अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीं विरोधात पारनेर येथील पो.स्टे.मध्ये दिनांक: १६/०८/२०२४ रोजी शासकीय कामात अडथळा आणत असल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पारनेर येथील मे. दिवानी न्यायालयात दावा क्र. ६२१/२०२३ यामध्ये दि. २७/०७/२०२३ रोजी सदर कोर्टाने अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींचे मनाई हुकुम दावा रद्द केलेला असून देखील शासकीय कर्मचारी अद्यापही राजकीय दबावामुळे विहिरीचे काम चालू शासकीय ओढ्यातील बेकायदेशीर अतिक्रमण काढून जल जीवन मिशन अंतर्गत पिण्याच्या पाण्याची विहीरीचे जागा निश्चित करून विहीरीचे काम चालू करण्याची विनंती करण्यात आली.संबंधित अधिकारी यांस वारंवार लेखी व तोंडी तसेच दूरध्वनीद्वारे संपर्क करूनही शासकीय योजना व लोकांच्या समस्यांना प्राथमिकता देने हे त्यांचे कर्तव्य असल्याचे विसरले असे वाटते म्हणून आम्हा सावरगाव ग्रामस्थांच्या वतीने दि. १३/०९/२०२४ रोजी सावरगाव नगर कल्याण महामर्गावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल मग होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी आपली व आपल्या प्रशासनाची राहील याची आपण गंभीर नोंद घ्यावी. असे सावरगाव येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना जलजीवन योजनेच्या कामामध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या व शासकीय जागेमध्ये अतिक्रमण करणाऱ्यांच्या विरोधात निवेदन दिले आहे.

### न्याय न मिळाल्यास आंदोलन करणार

**सावरगाव हे पारनेर तालुक्याच्या ग्रामीण भागातील महत्त्वाची ग्रामपंचायत असलेले गाव अनेक दिवसापासून गावचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर जलजीवन योजनेच्या माध्यमातून तो प्रश्न मार्गी लागेल असे वाटत असतानाच जलजीवन योजनेच्या कामामध्येच स्थानिक ग्रामस्थांनी अडथळा निर्माण केल्यामुळे सर्व गावातील ग्रामस्थांना एकत्र करून शासकीय जागेत अतिक्रमण करणाऱ्या लोकांवर त्वरित कारवाई करून त्यांचे अतिक्रमण हे काढण्यात यावे अशी निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना आम्ही देत आहोत न्याय न मिळाल्यास आंदोलनाची भूमिका घेणार आहे.**

अॅड. प्रियाताई नीलेश चिकणे

# वडनेरच्या सरस्वती महिला बचत गटाचे नाव राज्यात झळकले

## बायफ संस्थेच्या राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक



**निघोज : प्रतिनिधी**

**बायफ संस्थेच्या ५८ व्या वर्धापन दिनाच्या निमिताने वडनेर बु येथील सरस्वती महिला बचत गटानने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धे त सहभाग नोंदवला होता.त्यामध्ये राज्यभरातून अनेक गटांनी सहभाग नोंदवला होता.शेवट पर्यंत स्पर्धेत टिकून वडनेर बु , येथील सरस्वती महिला बचत गटाने राज्यात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवून वडनेर बु . चे नाव पुन्हा एकदा राज्यात झळकावले आहे.त्यामुळे या गटाचे सर्वत्र कौतुक होत आहे. नाशिक येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात रोख रक्कम व सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले .**

त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. गटातील स्वाती नऱ्हे, समाबाई चौधरी, रंभा नऱ्हे, लंका थोरात ,मंदाबाई वाजे ,ललिता नऱ्हे, नंदा नऱ्हे , सोनल नऱ्हे , ललिता वाजे, चंद्रभागा चौधरी , शारदा नऱ्हे आदींनी सहभाग घेतला होता.

यावेळी ज्योती भिटे व बायफ टिम यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक संचालक डॉ रविराज जाधव , कार्यकारी अधिकारी एस. एम . वागळे , अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप खोसे प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन अधिकारी नाशिक विभाग डॉ .बी.आर नरवडे , श्रीकृष्ण गांगुर्डे नाशिक तसेच मुकूल बाविस्कर हे होते यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आले. सूत्रसंचालन अश्लेषा देव यांनी केले.

# निघोजच्या सुनिती ज्वेलर्सचा मंगळसूत्र व पैंजण महोत्सव!

## ■ गणेशोत्सवाचे औचित्य ■ खरेदीवर हमखास बक्षीसे ■ गणेशशेठ कटारिया यांची माहिती

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील सुनिती ज्वेलर्स या सोने व चांदी अलंकार दुकानाच्या वतीने गणेशोत्सव निमित्ताने ११ दिवसांसाठी मंगळसूत्र महोत्सव व पैंजण महोत्सव आयोजित केला असून ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन सुनिती ज्वेलर्सचे मालक गणेशशेठ कटारिया यांनी केले आहे.**



अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले की गेली अनेक वर्षांपासून निघोज व परिसरात सुनिती ज्वेलर्स या सोने चांदी अलंकार दुकानाच्या माध्यमातून प्रत्येक सणासुदीला ग्राहकांना सोने चांदी अलंकार खरेदीवर आकर्षक बक्षीसे देण्याचा एक गौरवशाली उपक्रम सुनिती ज्वेलर्स माध्यमातून होत असतो. प्रत्येक वर्षी यामध्ये हजारो ग्राहक सहभागी होऊन बक्षीसांचा सन्मान मिळवीत असतात. यावर्षी गणेशोत्सव निमित्ताने शनिवार दि. ७ ते अनंत चतुर्दशी मंगळवार दि.१७ पर्यंत हा सोने चांदी अलंकार महोत्सव सूरु राहणार आहे. यामध्ये मंगळसूत्र खरेदीवर हमखास भेटवस्तू देण्यात येणार आहे. तसेच चांदी पैंजणाच्या पाच हजार रुपये पुढील खरेदीवर एक आकर्षण भेटवस्तू मिळणार आहे.

सुनिती ज्वेलर्सची वैशिष्टये सांगतना कटारियाशेठ यांनी सांगितले की असंख्य व्हरायटीज, शुद्ध व हॉल मार्क प्रमाणीत दागीणे, योग्य मजूरी व भाव , सुवर्ण संचय योजना अशाप्रकारे ग्राहकांसाठी असंख्य योजना ग्राहकांसाठी असून येत्या गणेशोत्सव निमित्ताने होणाऱ्या योजनेत ग्राहकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन बक्षीसांचा लाभ घ्यावा असे आवाहन सुनिती ज्वेलर्सचे मालक गणेशशेठ कटारिया यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी तयार केल्या इको फ्रेंडली गणेशमुर्त्या

## ब्लुमिंग बडस् प्रशालेत कलात्मक उपक्रम

**सुपा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण येथील ब्लुमिंग बडस् प्रशालेतील विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक अशा शाडूच्या मातीचा गणपती बनवण्यात दंग झाले, ही कार्यशाळा श्री भैरवनाथ विद्यालय पळवे येथील कलाशिक्षक कानिफनाथ गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतः गणपती बनवण्याचा आनंद घेतला.**

विद्यालयातील बालचमूंनी या माती कामांमध्ये स्वतः मातीचे गोळे करण्यापासून या कार्यशाळेत आवडीने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या चिमुकल्या बोटांनी गणरायाच्या आकर्षक अशी विविध रूपे साकारताना त्यांचे मातीकामातील कला कौशल्य आधोरित होत असताना पाहायला मिळाले. सुंदर अशा बनवलेल्या इको फ्रेंडली मातीच्या मुर्तीची स्थापना शाळेमध्ये करणार असल्याचे प्राचार्य धनंजय नाईक यांनी सांगितले.

(छाया - शरद रसाळ, सुपा)



### विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

**या कलात्मक उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असून आनंददायी शिक्षणातून मुलांना विविध कौशल्य प्राप्त होतात.**

कानिफनाथ गायकवाड
अध्यक्ष, पारनेर तालुका कलाशिक्षक संघटना

### आम्हाला आनंद वाटला

**इको फ्रेंडली शाडूचा गणपती बनवताना आम्हा विद्यार्थ्यांना फार आनंद वाटला आमच्या हातून गणरायाचे रूप साकारताना आम्हाला आत्मिक आनंद मिळाला.**

स्नेहल शिवाजी कदम, विद्यार्थिनी.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com